**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**अमरावती विभागीय मंडळ, अमरावती – ४४४ ६०२**

पत्र क्र. अविमं/भांडार/८१८
दिनांक: ११.०७.२०२२

प्रति,

.............................................

.............................................

**विषय :**–अमरावती विभागीय मंडळाच्या जुन्या वाहनतळाची दुरूस्ती करून वाहनतळ वाढविणे व कार्यालयाचे मागील भागात कार्यालयीन चारचाकी वाहनांसाठी नवीन वाहनतळ तयार करण्याकरीता दरपत्रक सादर करण्याबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयीन परिसरातील दर्शनी भागा समोरील वाहनतळाची भू–पृष्ठाची जागा पूर्णपणे नादुरूस्त झाली असून तेथील सिमेंटकॉन्क्रीट पूर्णपणे उखडलेले आहे. सदर वाहनतळाची दुरूस्ती करणे, वाहनतळ दोन्ही बाजुंनी वाढविणे व चारचाकी वाहनांसाठी नवीन वाहनतळ तयार करण्याकरीता आपणाकडून दरपत्रक बोलविण्यात येत आहेत. **दरपत्रके सादर करण्यापुर्वी प्रत्यक्ष कामाची पाहणी करावी व नंतरच दरपत्रके सादर करावी,** दरपत्रके या कार्यालयास दि. 21/०७/२०२२ पर्यन्त कार्यालयीन वेळेत विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, टोपेनगर, अमरावती येथे पाकीटावर विषय लिहून बंद पाकिटात सादर करावीत.

11/7/2022
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती



Scanned by CamScanner

## अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील :-

१) वाहनतळ दुरूस्ती/नविन चारचाकी वाहनतळ करीता वापरावयाचे सिमेंट, लोखंड, लोखंडी टिने इत्यादी सर्व हे साहित्य उच्च प्रतीचे व नामांकित कंपनीचे घेउन ते प्रमाणकानुसार वापरणे आवश्यक राहिल.

२) वाहनतळ दुरूस्ती /नविन चारचाकी वाहनतळानंतर करण्यात येणारी रंगरंगोटी/ कलर हे सुध्दा नामांकित कंपनीचे असने आवश्यक आहे.

३) बांधकामासाठी लागणारे साहित्य ते ने-आण करण्याची /वाहतूकीची जबाबदारी /लेबर वर्क इत्यादी खर्च सदर कामामध्ये अंतर्भूत राहील.

४) आपण दरपत्रकात दर्शविलेल दर हे सर्व करासहीत त्यामध्ये समावेश करावा.

५) सदर काम कार्यदिश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत काम सुरु करावे लागेल आणि कामसुरु झाल्यापासून १ महिण्याच्या आत पूर्ण करावे.

६) काम पूर्ण झाल्यानंतर देयक दोन प्रतीत सादर करावे.

७)तसेच देयकामधून नियमानुसार २% आयकर व २% जी.एस.टी.चा टी.डी.एस. कपात करण्यात येईल.देयकासोबत पॅनकार्डची झेरॉक्सप्रत जोडणे आवश्यक राहील.

**८) दरपत्रक धारकाणे प्रथम दरपत्रके सादर करण्यापुर्वी मंडळ कार्यालयातील करावयाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी पाहणी केल्यानंतर या करीता पाहणी केल्याबाबत भांडार शाखेने नोंदवही ठेवण्यात आलेली आहे,त्यामध्ये नोंदकरुन स्वक्षरी करावी त्या नंतरच दरपत्रके सादर करावी.**

९) या संबंधात काही कायदेशीर प्रकरण उद्‌भवल्यास ते अमरावती येथील मा.न्यायालयाच्या कक्षेत राहील.

१०) सदर कराराचे व कामा संदर्भात शासनाचे अन्य/अनुषंगीक कर असल्यास तो भरण्याची जबाबदारी आपली (दरपत्रकधारकाची) राहील.

११) कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार मंडळाच्या सक्षम समितीने राखून ठेवले आहेत.

१२) आपणास कार्यादेश दिल्यानंतर आपण काम न स्विकारल्यास आपली सुरक्षा ठेव जप्त करणे वा इतर दंडात्मक कारवाई करण्यासंबंधी मंडळाचे सक्षम समितीचा निर्णय आपणावर बंधनकारक राहील.

१३) दरपत्रकात कोणतीही अट टाकू नये. अन्यथा आपले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१४) दर मान्य झाल्यास रू.७००/-च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून सोबत रू.२५,०००/- (पंचवीस हजार रूपये फक्त) रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा ( सुरक्षा ठेवीचा)धनाकर्ष/डी.डी. करारपत्रासोबत जोडावा लागेल

१५) अपणाकडुन नेमलेल्या व्यक्तीवर सोपविलेली कामे योग्यरितीने व मंडळाच्या अपेक्षेप्रमाणे पार पाडले जातात याबाबत पाहण्याची जबाबदारी आपली राहिल. कामाच्या वेळेस संबंधित व्यक्तीकडून मंडळाच्या संपत्तीचे नुकसान झाल्यास त्यांची भरपाई आपणास करावी लागेल अथवा एखाद्या व्यक्तीस ईजा, दुखापत अपघातामुळे अपंगत्व वा मुत्यू झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील, यांची नोंद घ्यावी.

१६) उपरोक्त अटी पैकी एखादी अट शिथील अथवा नव्याने वाढ करण्याचा अधिकार मंडळाचा असेल.

१७) दरपत्रकाचे बंद पाकीट दि. /०७/२०२२ पर्यन्त मंडळात दुपारी ४:०० वाजेपर्यत न चूकता जमा करावीत.

१८) आपणाकडे शासनाने दिलेला बांधकामाचा परवाना असने अनिवार्य असुन दरपत्रकासोबत त्याची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

(signature) 11/7/2022

विभागीय सचिव

अमरावती विभागीय मंडळ, अमरावती

Scanned by CamScanner